# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-28.04.2026** **वार- मंगळवार**

---

**राज्यपाल**

देशाला २०४७ पर्यंत 'विकसित भारत' घडविण्यासाठी, नवोपक्रम, संशोधन आणि सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्था अत्यावश्यक असून, या माध्यमातून विकासाचे लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केलं.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या १०० व्या वार्षिक महासभेचं, तसंच पिंपरी मधल्या डॉक्टर डी. वाय. पाटील विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय कुलगुरू परिषदेचं उद्घाटन राज्यपालांच्या हस्ते पार पडलं त्यावेळी ते बोलत होते. "ज्ञान आणि नवोपक्रमातून स्वावलंबी भारत घडवणे" हा या परिषदेचा विषय आहे.

कार्यक्रमाला एआययूचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर विनय कुमार पाठक, महासचिव डॉक्टर पंकज मित्तल, डॉक्टर डी. वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉक्टर पी. डी. पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, नवोपक्रम आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्याची गरज यावेळी राज्यपालांनी व्यक्त केली. कौशल्य विकासाला प्राधान्य देत सर्वसमावेशक शिक्षण पद्धती उभारण्याचं आवाहनही राज्यपालांनी केलं. "ट्रान्सफॉर्मेशन ऑफ एज्युकेशन" या एआययूच्या १०० वर्षांच्या स्मरणिकेचं तसंच "इंडियन युनिव्हर्सिटी जर्नल" चं राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आलं.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या उत्तर प्रदेश दौऱ्यावर आहेत. या दौऱ्या दरम्यान, बनारस पुणे आणि अयोध्या मुंबई या दोन अमृत भारत एक्सप्रेस गाड्यांना पंतप्रधान उद्या हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

बनारस-पुणे ही रेल्वेसेवा दररोज असणार आहे. हडपसर, हे या मार्गाचं शेवटचं स्थानक आहे. ही गाडी बनारस इथून सायंकाळी निघेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री उशिरा हडपसर इथं पोहोचेल.

अयोध्या-मुंबई ही गाडी आठवड्यातून एकदा धावणार आहे. भारताच्या मुख्य सांस्कृतिक आणि वित्तीय मार्गिकांना परस्परांशी जोडणाऱ्या या गाड्यांमुळे भविक आणि कामगार वर्गाची मोठी सोय होणार आहे. अल्प उत्पन्न आणि मध्यम वर्गाच्या कुटुंबांसाठी, विशेषतः चालवण्यात येणाऱ्या, ह्या अमृत भारत गाड्या पूर्णपणे बिगर- वातानुकुलित, अत्याधुनिक सेवा असलेल्या आणि सुरक्षितता तसंच प्रवाशांच्या सुविधांवर भर देणाऱ्या आहेत.

पुणे- बनारस गाडीमुळे, काशी विश्वनाथ धामला जाण्याची सोय होऊ शकेल,  तर मुंबई अयोध्या गाडी, श्री राम मंदिर तीर्थक्षेत्राला जाण्यासाठी उपयुक्त ठरेल.

पुणे हे महाराष्ट्रातील एक मोठे शैक्षणिक केंद्र असून, सांस्कृतिक  आणि कला राजधानी म्हणून पुणे शहराची ओळख आहे. पुण्याशी थेट आणि परवडणारी संपर्क सेवा उपलब्ध झाल्यानं स्थानिक व्यापाऱ्यांसाठी नवीन बाजारपेठा खुल्या होतील.  पुण्याप्रमाणेच  अलाहाबादही आयटी आणि उत्पादन केंद्र आहे, त्यामुळे या  जोडणीचा थेट फायदा महाराष्ट्रात संधी शोधणाऱ्या अलाहाबाद  शहरातील विद्यार्थी आणि व्यावसायिक वर्गाला होईल. या गाडीमुळे मध्य प्रदेश, जळगाव, भुसावळ इथल्या शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांनाही घाऊक बाजारपेठांमध्ये जलद आणि स्वस्त प्रवेश मिळेल. या गाडीनं शिर्डी तीर्थक्षेत्रालाही जाता येईल.

**<u>मिळकतकर</u>**

पुणे महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि  करसंकलन विभागानं वर्ष २०२६-२७ ची मिळकतकर देयकं तयार केली असून पोस्टातर्फे त्यांचं वितरण करण्यात येत आहे. मिळकत करामध्ये ५ ते १०% सवलत जाहीर करण्यात आली असून ही सवलत ३१ मे २०२६ पर्यंत लागू असेल.

पुणे महानगरपालिकेच्या सर्व नागरी सुविधा केंद्रांमध्ये सोमवार ते शनिवार सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत, तसंच ऑनलाइन पद्धतीनं देखील, कर भरता येईल.  नागरिकांच्या सोयीसाठी  बँक ऑफ महाराष्ट्र, आय.सी.आय.सी.आय. बँक आणि कॉसमॉस बँकेत देखील मिळकतकर भरता येणार आहे.

**<u>निधन</u>**

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्थेचे माजी संचालक, प्राध्यापक विकास चित्रे यांचं काल पुण्यात, वृद्धापकाळामुळे निधन झालं. ते 86 वर्षांचे होते. प्राध्यापक चित्रे यांनी त्यांच्या कार्यकाळात, केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांच्या तसंच आयोगांच्या कामात सहभाग नोंदवला. 'मायक्रो ईकॉनॉमिक्स' या विषयातील तज्ज्ञ म्हणून ते परिचित होते. अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमधून त्यांनी आपले शोधनिबंध सादर केले होते.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरातला उन्हाचा कडाका कायम असून आज कमाल तापमान 40 तर किमान तापमान 24 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

देशाच्या विविध भागांमध्ये येत्या काही दिवसांत उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून या पार्श्वभूमीवर राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनी सज्जता आणखी दृढ करावी, अशा सूचना केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं दिल्या आहेत.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतसह.**

**नमस्कार.**